**L. A. BILL No. XLVIII OF 2026.**

*A BILL*

*TO PROVIDE FOR RECOGNITION OF WOMEN FARMERS AND ISSUANCE OF WOMAN FARMER CERTIFICATES IN ORDER TO ENABLE THEIR ACCESS TO VARIOUS WELFARE POLICIES, PROGRAMMES, SCHEMES AND CREDIT, TO ESTABLISH WOMEN FARMERS DATABASE, A MAHARASHTRA STATE FUND FOR WOMEN FARMERS, A WOMEN FARMERS EMPOWERMENT CELL, WOMAN FARMER EMPOWERMENT COUNCIL AND STATE MONITORING COMMITTEE, AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.*

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४८.**

**महिला शेतकऱ्यांना विविध कल्याणकारी धोरणे, कार्यक्रम, योजना व पतकर्ज यांचा लाभ मिळणे शक्य व्हावे या दृष्टीने, महिला शेतकऱ्यांना मान्यता देण्यासाठी व महिला शेतकरी प्रमाणपत्रे देण्यासाठी, महिला शेतकऱ्यांची आधारसामग्री (डेटाबेस) तयार करण्यासाठी,**

**महाराष्ट्र राज्य महिला शेतकरी निधी, महिला शेतकरी सक्षमीकरण कक्ष, महिला शेतकरी सक्षमीकरण परिषद व राज्य संनियंत्रण समिती स्थापन करण्यासाठी आणि तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक.**

**ज्याअर्थी,** राज्यातील ग्रामीण भागांतील महिला मोठ्या संख्येने शेती क्षेत्रामध्ये कार्यरत आहेत;

**आणि ज्याअर्थी,** शेतीमध्ये महिलांचा वाढता सहभाग लक्षात घेता, शेतीच्या भविष्यातील वाढीसाठी व शाश्वततेसाठी, वातावरण बदलाच्या काळामध्ये अन्नसुरक्षेची सुनिश्चिती करण्यासाठी आणि महिला शेतकरी व त्यांच्या कुटुंबाच्या कल्याणासाठी, महिला शेतकऱ्यांना मान्यता देणे व त्यांचे सक्षमीकरण करणे अत्यावश्यक आहे ;

**आणि ज्याअर्थी,** महिला शेतकऱ्यांना विविध कल्याणकारी धोरणे, कार्यक्रम, योजना व पतकर्ज यांचा लाभ मिळणे शक्य व्हावे यादृष्टीने, महिला शेतकऱ्यांना मान्यता देण्यासाठी व महिला शेतकरी प्रमाणपत्रे देण्यासाठी, महिला शेतकऱ्यांची आधारसामग्री (डेटाबेस) तयार करण्यासाठी, महाराष्ट्र राज्य महिला शेतकरी निधी, महिला शेतकरी सक्षमीकरण कक्ष, महिला शेतकरी सक्षमीकरण परिषद व राज्य संनियंत्रण समिती स्थापन करण्यासाठी आणि तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव. **१.** या अधिनियमास, महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

व्याख्या. **२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,-

(क) "शेती" यामध्ये, पिकांची लागवड, बीज उत्पादन, पशुसंवर्धन, कुक्कुटपालन, दुग्ध व्यवसाय, पशुपालन, मधुमक्षिका पालन, चारा लागवड, मधमाशा पालन, मासेमारी, जलीय संवर्धन, रेशीम उत्पादन, गांडूळ खत निर्मिती, फलोत्पादन, पुष्पोत्पादन, अळंबी लागवड, कृषी-वनीकरण, चराईसाठी किंवा रॅब-खतासाठी कोणत्याही जमिनीचा किंवा तिच्या भागाचा वापर, स्वयंरोजगारातून केली जाणारी कंपोस्ट खत निर्मितीची किंवा अन्य कोणतीही शेतीविषयक कार्ये, कुळवहिवाटीने लागवड, बटाई, अथवा स्थलांतरित शेतीसह इतर प्रकारची लागवड, मालकी हक्कांच्या किंवा फलोपभोगहक्कांच्या आधारे गौण किंवा इमारती लाकूड नसलेले वनोत्पादन गोळा करणे, वापर व विक्री करणे यांच्याशी संबंधित असलेली सर्व कार्ये,- मग ती मोबदल्यासाठी केले जात असो किंवा नसो-, यांचा समावेश होतो;

(ख) "अपील अधिकारी" याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम ४ च्या पोट-कलम (२) अन्वये राज्य शासनाने नियुक्त केलेला अपील अधिकारी, असा आहे;

(ग) "पदनिर्देशित अधिकारी" याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम ४ च्या पोट-कलम (१) अन्वये राज्य शासनाने पदनिर्देशित केलेला अधिकारी, असा आहे;

(घ) "शेतकरी" याचा अर्थ, जी महिला महाराष्ट्राची रहिवासी आहे आणि जी, वैयक्तिकरीत्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीसह संयुक्तरीत्या,-

(एक) जमिनीचे स्वरूप विचारात न घेता, कृषी व्यवसायात आहे;

(दोन) बियाणांचे विविध कृषी वाण, कोणत्याही प्रकारचे शेती उपयोगी पशू व मासे यांचे कोणतेही नवशोध, संवर्धन, जतन किंवा प्रचार करण्यात; वातावरण अनुकूलन लागवड पद्धती, किंवा एकात्मिक शेती पद्धतीचा अवलंब करण्यात योगदान देत आहे;

(तीन) प्राथमिक प्रक्रियेमध्ये सहभाग घेऊन प्राथमिक उत्पादनाचे किंवा कच्च्या कृषी व प्राणिजन्य उत्पादनाचे मूल्यवर्धन करीत आहे,

अशी कोणतीही महिला, असा आहे ; आणि

त्यात,-

(क) कृषी कार्यधारक, तोंडी किंवा लेखी कराराद्वारे अथवा करारनाम्याद्वारे भाडेपट्ट्याने शेती करणारा, भूमिहीन शेतकरी, भूमिहीन पशुपालक, शेतमजूर, रोपमळा मजूर किंवा पशु चारक (गुराखी); किंवा

(ख) वर्षभरात किमान एका शेती हंगामात राज्यामध्ये शेती व्यवसाय करणाऱ्या आणि कोणत्याही प्रयोजनासाठी राज्याबाहेर किंवा राज्यांतर्गत स्थलांतर करणाऱ्या महिला,

यांचा समावेश होतो;

(ङ) "ग्रामसभा" याचा अर्थ,–

१९९६ चा ४०. (एक) अनुसूचित क्षेत्राच्या बाबतीत, पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम, १९९६ या खाली केलेल्या नियमांन्वये व्याख्या केलेली ग्रामसभा ;

१९५९ चा ३. (दोन) अनुसूचित क्षेत्राव्यतिरिक्त अन्य कोणत्याही क्षेत्राच्या बाबतीत महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (९) मध्ये व्याख्या केलेली ग्रामसभा असा आहे ;

(च) "जमीन" याचा अर्थ, जी जमीन, शेतीच्या प्रयोजनांसाठी वापरली जाते, किंवा वापरण्यायोग्य आहे, अशी जमीन, असा आहे, आणि त्यात,-

(एक) अशा जमिनीवर असलेल्या किंवा तिच्याशी अनुलग्न असलेल्या शेतातील इमारतींच्या जागा;

(दोन) ज्या जमिनीवर नैसर्गिकरीत्या गवत उगवते ती जमीन;

(तीन) अशा जमिनीवरील झाडे व उभी पिके;

(चार) शेतीच्या प्रयोजनासाठी पाण्याचा पुरवठा करण्यासाठी किंवा पाणी साठवण्यासाठी अशा जमिनीवर बांधलेले किंवा ठेवलेले कालवे, जलमार्ग, विहिरी, जलवाहिन्या, जलाशय किंवा इतर बांधकामे; आणि

(पाच) शेतीच्या प्रयोजनांसाठी अशा जमिनीशी अनुलग्न असलेली, किंवा त्यावर बांधकाम केलेली किंवा ठेवलेली जलनिस्सारण बांधकामे, भराव, बंधारे किंवा इतर कोणतीही बांधकामे; आणि अशा जमिनीवरील सर्व संरचना व कायमस्वरूपी जोडण्या,

यांचा समावेश होतो;

(छ) "निधी" याचा अर्थ, कलम ११ अन्वये स्थापन केलेला महाराष्ट्र राज्य महिला शेतकरी निधी, असा आहे;

१९६५ चा महा. ४०. (ज) "नगर पंचायत" याचा अर्थ, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अन्वये घटित केलेली नगर पंचायत, असा आहे;

(झ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे;

(ञ) "प्राथमिक प्रक्रिया" याचा अर्थ, उपभोग घेण्यासाठी किंवा आणखी प्रक्रियेसाठी कच्च्या उत्पादनाचे किंवा पदार्थाचे सुयोग्य रूपात रूपांतर करणे, असा आहे;

(ट) "एकल महिला" याचा अर्थ, जिचे वय १८ वर्षांपेक्षा अधिक आहे आणि जिचा पती एकतर मयत झालेला आहे किंवा बेपत्ता आहे, जी परित्यक्त्या आहे किंवा जिची न्यायिक फारकत झाली आहे, जी घटस्फोटित अथवा अविवाहित आहे अशी महिला, असा आहे;

(ठ) "राज्य संनियंत्रण समिती" याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम १३ अन्वये घटित केलेली राज्य संनियंत्रण समिती, असा आहे;

(ड) “ग्रामपंचायत” याचा अर्थ, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमान्वये घटित केलेली पंचायत, असा आहे; १९५९ चा ३.

(ढ) “महिला शेतकरी” याचा अर्थ, जिचे वय अठरा वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक आहे आणि जी शेतकरी आहे, अशी कोणतीही महिला, असा आहे;

(ण) “महिला शेतकरी सहायक अधिकारी” याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम १५ अन्वये महिला शेतकरी सहायक अधिकारी म्हणून नियुक्त केलेला अधिकारी, असा आहे;

(त) “महिला शेतकरी प्रमाणपत्र” याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम ५ व ६ अन्वये पदनिर्देशित अधिकाऱ्याने महिलेला दिलेले प्रमाणपत्र, असा आहे;

(थ) “महिला शेतकरी सक्षमीकरण कक्ष” याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम १४ अन्वये स्थापन केलेला महिला शेतकरी सक्षमीकरण कक्ष, असा आहे.

(द) “महिला शेतकरी सक्षमीकरण परिषद” किंवा “परिषद” याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम १२ अन्वये घटित केलेली महिला शेतकरी सक्षमीकरण परिषद, असा आहे; आणि

(ध) “महिला शेतकरी आधारसामग्री (डेटाबेस)” याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम १० अन्वये संकलित केलेली व परिरक्षण केलेली महिला शेतकरी आधारसामग्री (डेटाबेस), असा आहे.

महिला शेतकरी म्हणून मान्यता देणे.

**३.** जी महिला अठरा वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयाची आहे, आणि ग्रामपंचायतीच्या किंवा नगर पंचायतीच्या क्षेत्रात रहात आहे, आणि जी शेतकरी आहे अशी प्रत्येक महिला, या अधिनियमान्वये महिला शेतकरी म्हणून मान्यता मिळण्यास पात्र असेल आणि या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, तिला महिला शेतकरी प्रमाणपत्र देता येईल.

पदनिर्देशित अधिकाऱ्यांची व अपील अधिकाऱ्यांची नियुक्ती.

**४.** (१) राज्य शासन, या अधिनियमाखालील कर्तव्ये व कार्ये पार पाडण्यासाठी, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, ग्रामपंचायत क्षेत्राकरिता, ज्यांचा सहायक कृषी अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसेल आणि नगर पंचायत क्षेत्राकरिता, ज्यांचा कृषी अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसेल, इतक्या संख्येत अधिकाऱ्यांची, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, पदनिर्देशित अधिकारी म्हणून नियुक्ती करील.

(२) राज्य शासन, या अधिनियमाखालील अधिकारांचा वापर करण्यासाठी व कर्तव्ये पार पाडण्यासाठी, त्यास योग्य वाटेल इतक्या संख्येत अशा, क्षेत्रांकरिता, तालुका कृषी अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यांची, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अपील अधिकारी म्हणून नियुक्ती करील.

ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात महिला शेतकरी प्रमाणपत्र देणे.

**५.** (१) ग्रामपंचायतीच्या अधिकारक्षेत्रात राहणाऱ्या शेतकरी असलेल्या कोणत्याही महिलेस, महिला शेतकरी म्हणून मान्यता मिळण्याकरिता आणि महिला शेतकरी प्रमाणपत्र मिळण्याकरिता, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने, पदनिर्देशित अधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल.

(२) पदनिर्देशित अधिकारी, पोट-कलम (१) अन्वये प्राप्त झालेले सर्व अर्ज, पुढील नियमित सभेमध्ये किंवा या प्रयोजनासाठी बोलविण्यात आलेल्या विशेष सभेमध्ये ग्राभसभेसमोर ठेवील.

(३) ग्रामसभा, पोट-कलम (२) अन्वये तिच्यासमोर ठेवलेल्या अर्जावर, प्रत्येक अर्जदार, या अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (क) व (घ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कार्यांपैकी किमान एक कार्य करीत आहे किंवा कसे, याबाबत विचार केल्यानंतर, एकतर असा अर्ज स्वीकारल्याचा किंवा नाकारल्याचा ठराव संमत करील:

परंतु, असा कोणताही अर्ज नाकारला असेल तर, ग्रामसभा, ठरावांमध्ये असे नाकारण्याची कारणे लेखी स्वरूपात देईल:

परंतु आणखी असे की, ग्रामसभेस, तिच्या अधिकारक्षेत्रातील ज्या महिलांनी पोट-कलम (१) अन्वये

महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला नाही, परंतु ज्या शेतकरी आहेत अशा महिलांना देखील, ठरावाद्वारे, महिला शेतकरी म्हणून स्वाधिकारे मान्यता देता येईल आणि त्यांना महिला शेतकरी प्रमाणपत्रे देण्याचे निदेश पदनिर्देशित अधिकाऱ्यास देता येतील.

(४) जेव्हा ग्रामसभेने, पोट-कलम (३) अन्वये केलेल्या तिच्या ठरावाद्वारे, कोणत्याही महिलेस, महिला शेतकरी म्हणून मान्यता दिलेली असेल तेव्हा, पदनिर्देशित अधिकारी, असा ठराव संमत झाल्यापासून पंधरा दिवसांच्या कालावधीच्या आत, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने, महिला शेतकरी प्रमाणपत्र देईल.

(५) जेव्हा, ग्रामसभेने, पोट-कलम (३) अन्वये केलेल्या तिच्या ठरावाद्वारे, अर्जदारास, महिला शेतकरी म्हणून मान्यता देण्याचे नाकारले असेल तेव्हा, पदनिर्देशित अधिकारी, असा ठराव संमत झाल्यापासून सात दिवसांच्या कालावधीच्या आत, अर्जदारास,-

(क) ग्रामसभा ठरावामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अशी नाकारण्याची कारणे;

(ख) असे नाकारल्याच्या विरुद्ध ज्या कालावधीत अपील दाखल करता येईल तो कालावधी; आणि

(ग) ज्याच्याकडे अपील दाखल करता येईल, त्या अपील अधिकाऱ्याचा तपशील,

लेखी कळवील.

(६) (क) पोट-कलम (३) अन्वये महिला शेतकरी म्हणून मान्यता देण्याचा अर्ज नाकारणाऱ्या ग्रामसभेच्या ठरावामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, अशा ठरावाच्या दिनांकापासून एकशे वीस दिवसांच्या कालावधीच्या आत; किंवा

(ख) पदनिर्देशित अधिकाऱ्याने, पोट-कलम (४) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत महिला शेतकरी प्रमाणपत्र देण्यात कसूर केल्यामुळे, व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, असा कालावधी समाप्त झाल्यानंतर आणि त्याच्या एकशे वीस दिवसांच्या कालावधीच्या आत,

विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने, अपील अधिकाऱ्याकडे अपील दाखल करता येईल.

(७) अपील अधिकारी, अपील प्राप्त झाल्यावर, अपिलातील पक्षकारांना म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, अपील दाखल केल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत, असे अपील विचारात घेईल आणि सकारण आदेशासह ते निकालात काढील:

परंतु, अपिलकारास उक्त कालावधीत अपील दाखल न करण्यासाठी पुरेशा कारणामुळे प्रतिबंध झाला होता अशी अपील अधिकाऱ्याची खात्री पटली असेल तर, तो एकशेवीस दिवसांच्या कालावधीच्या समाप्तीनंतर देखील अपील दाखल करुन घेऊ शकेल.

(८) जेव्हा अपील अधिकाऱ्याचे, अपिलाची सुनावणी केल्यावर, अपीलकार ही, महिला शेतकरी आहे असे मत झाले असेल तेव्हा, तो, आदेशाच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या कालावधीच्या आत, अपीलकारास महिला शेतकरी प्रमाणपत्र देण्याचा निदेश, पदनिर्देशित अधिकाऱ्याला देईल.

नगर पंचायतीच्या क्षेत्रात महिला शेतकरी प्रमाणपत्र देणे.

**६.** (१) नगरपंचायतीच्या अधिकारक्षेत्रात राहणाऱ्या शेतकरी असलेल्या कोणत्याही महिलेस, महिला शेतकरी म्हणून मान्यता मिळण्याकरिता आणि महिला शेतकरी प्रमाणपत्र मिळण्याकरिता, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने, पदनिर्देशित अधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल.

(२) पदनिर्देशित अधिकारी, पोट-कलम (१) अन्वये प्राप्त झालेले सर्व अर्ज, पुढील नियमित सभेमध्ये किंवा या प्रयोजनासाठी बोलविण्यात आलेल्या नगरपंचायतीच्या पुढील सर्वसाधारण सभेत नगरपंचायतीसमोर ठेवील.

(३) नगरपंचायत, पोट-कलम (२) अन्वये तिच्यासमोर ठेवलेल्या अर्जावर, प्रत्येक अर्जदार, या अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (क) व (घ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कार्यांपैकी किमान एक कार्य करीत आहे किंवा कसे, याबाबत विचार केल्यानंतर, एकतर असा अर्ज स्वीकारल्याचा किंवा नाकारल्याचा ठराव

संमत करीलः

परंतु, कोणताही असा अर्ज नाकारला असेल तर, नगरपंचायत, ठरावांमध्ये असे नाकारण्याची कारणे लेखी स्वरूपात देईलः

(४) जेव्हा नगरपंचायतीने, पोट-कलम (३) अन्वये केलेल्या तिच्या ठरावाद्वारे, अर्जदारास, महिला शेतकरी म्हणून मान्यता दिलेली असेल तेव्हा, पदनिर्देशित अधिकारी, असा ठराव संमत झाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या कालावधीच्या आत, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने, महिला शेतकरी प्रमाणपत्र देईल.

(५) जेव्हा, नगरपंचायतीने, पोट-कलम (३) अन्वये केलेल्या तिच्या ठरावाद्वारे, अर्जदारास, महिला शेतकरी म्हणून मान्यता देण्याचे नाकारले असेल तेव्हा, पदनिर्देशित अधिकारी, असा ठराव संमत झाल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या कालावधीच्या आत, अर्जदारास,-

(क) नगरपंचायत ठरावांमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अशी नाकारण्याची कारणेः

(ख) असे नाकारल्याच्या विरुद्ध ज्या कालावधीत अपील दाखल करता येईल तो कालावधीः आणि

(ग) ज्याच्याकडे अपील दाखल करता येईल, त्या अपील अधिकाऱ्याचा तपशील,

लेखी कळवील.

(६) (क) पोट-कलम (३) अन्वये महिला शेतकरी म्हणून मान्यता देण्याचा अर्ज नाकारणाऱ्या नगरपंचायतीच्या ठरावामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, अशा ठरावाच्या दिनांकापासून एकशे वीस दिवसांच्या कालावधीच्या आत; किंवा

(ख) पदनिर्देशित अधिकाऱ्याने, पोट-कलम (४) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत महिला शेतकरी प्रमाणपत्र देण्यात कसूर केल्यामुळे, व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, असा कालावधी समाप्त झाल्यानंतर एकशे वीस दिवसांच्या कालावधीच्या आत,

विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने, अपील अधिकाऱ्याकडे अपील दाखल करता येईल.

(७) अपील अधिकारी, अपील प्राप्त झाल्यावर, अपिलातील पक्षकारांना म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, अपील दाखल केल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत, असे अपील विचारात घेईल आणि सकारण आदेशासह, निकालात काढीलः

परंतु, अपीलाकारास उक्त कालावधीत अपील दाखल न करण्यासाठी पुरेशा कारणामुळे प्रतिबंध झाला होता अशी अपील अधिकाऱ्याची खात्री पटली असेल तर, एकशे वीस दिवसांच्या कालावधीच्या समाप्तीनंतर देखील अपील दाखल करुन घेऊ शकेल.

(८) जेव्हा अपील अधिकाऱ्याचे, अपिलाची सुनावणी केल्यावर, अपीलकार ही, महिला शेतकरी आहे असे मत झाले असेल तेव्हा, तो, आदेशाच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या कालावधीच्या आत, अपीलकारास महिला शेतकरी प्रमाणपत्र देण्याचा निदेश, पदनिर्देशित अधिकाऱ्याला देईल.

महिला शेतकरी प्रमाणपत्र रद्द होणे.

**७.** महिला शेतकरी प्रमाणपत्र, ती महिला शेतकरी असेल तोपर्यंत वैध असेल, जर महिला, नियमितपणे शेतकरी राहिली नाही तर, ती, या अधिनियमान्वये अशा प्रमाणपत्राचे लाभ मिळण्यास हक्कदार असणार नाही आणि तिचे प्रमाणपत्र रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

महिला शेतकरी प्रमाणपत्राचा वापर.

**८.** (१) या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी महिला शेतकरी म्हणून एखाद्या महिलेची ओळख पटविण्याच्या प्रयोजनार्थ, महिला शेतकरी प्रमाणपत्र हे, निर्णायक पुरावा असेल.

(२) महिला शेतकरी प्रमाणपत्र धारण करणारी महिला, राज्य शासनाने वेळोवेळी अधिसूचित केलेली धोरणे, कार्यक्रम व योजना यांखालील हक्क, लाभ, अर्थसहाय्य व सेवा, त्यामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींना अधीन राहून, मिळण्यास हक्कदार असेल.

(३) राज्य शासनास,–

(क) कृषी विषयक अर्थसहाय्य;

(ख) बियाणे, खते व इतर शेती निविष्टी यांचे वितरण;

(ग) कृषी पत कर्ज, पीक विमा व विस्तार सेवा;

(घ) कृषी उत्पादने बाजारात पोहोचविणे, त्यांची वाहतूक, साठवणूक व खरेदी-विक्री करणे यांची सुविधा;

(ङ) एकल महिला शेतकऱ्यांसाठी विशेष सहाय्यता कार्यक्रम, कौशल्य विकास व लक्ष्यित सहाय्य;

(च) राज्य शासन निर्धारित करील अशा इतर कोणत्याही बाबी,

यांच्याशी संबंधित असणाऱ्या बाबींच्या संबंधात महिला शेतकऱ्यांच्या व त्यांच्या गटांच्या कल्याणाकरिता वेळोवेळी, सुयोग्य धोरणे, कार्यक्रम व योजना तयार करता येतील.

महिला शेतकरी प्रमाणपत्राच्या माध्यमातून पत कर्ज मिळणे.

**९.** महिला शेतकरी प्रमाणपत्र धारण करणाऱ्या महिला, राज्यशासनाने, वेळोवेळी अधिसूचित केलेली राज्य शासनाची पत कर्ज धोरणे, कार्यक्रम व योजना यांखालील सुयोग्य स्वरुपातील पत कर्ज मिळण्यास हक्कदार असतील.

महिला शेतकऱ्यांची आधारसामग्री (डेटाबेस) तयार करणे.

**१०.** (१) राज्य शासन, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, विहित केलेल्या रीतीने महिला शेतकऱ्यांची आधारसामग्री (डेटाबेस) संकलित करील व ठेवील.

(२) महिला शेतकऱ्यांच्या आधारसामग्रीमध्ये (डेटाबेस), या अधिनियमान्वये जिला महिला शेतकरी प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे, त्या प्रत्येक महिला शेतकऱ्याची माहिती अंतर्भूत असेल.

महाराष्ट्र राज्य महिला शेतकरी निधी.

**११.** (१) राज्य शासन, महाराष्ट्र राज्य महिला शेतकरी निधी घटित करील आणि त्यामध्ये, पुढील पैसे जमा करण्यात येतील:-

(क) केंद्र सरकारकडून किंवा राज्य शासनाकडून मिळालेले कोणतेही अनुदान;

(ख) इतर संस्थांकडून व व्यक्तींकडून मिळालेली कोणतीही अनुदाने, देणग्या, दान, धर्मदान; आणि

(ग) राज्य शासनाद्वारे, वेळोवेळी, अधिसूचित करण्यात येतील अशा इतर कोणत्याही रकमा.

(२) निधी, राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली व व्यवस्थापनाखाली असेल आणि तो, पुढील प्रयोजनांसाठी वापरण्यात येईल:-

(क) महिला शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी व विकासासाठी कार्यक्रम राबविणे व सहाय्य पुरविणे;

(ख) महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी वित्त पुरवठा उपाययोजना करणे;

(ग) महिला शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी सहाय्य करण्यासाठी व विकासासाठी सुविधा पुरविणे; आणि

(घ) विहित करण्यात येतील अशा इतर बाबी.

महिला शेतकरी सक्षमीकरण परिषदेची स्थापना.

**१२.** (१) राज्य शासन, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, महिला शेतकरी सक्षमीकरण परिषदेची स्थापना करील.

(२) महिला शेतकरी सक्षमीकरण परिषद, पुढील पदसिद्ध सदस्यांची मिळून बनलेली असेल:-

| | |
|---|---|
| (क) मुख्यमंत्री | अध्यक्ष; |
| (ख) उपमुख्यमंत्री | सदस्य; |
| (ग) कृषी मंत्री | सदस्य; |
| (घ) महिला व बाल विकास मंत्री | सदस्य; |

| | |
|---|---|
| (ङ) ग्रामविकास मंत्री | सदस्य; |
| (च) सहकार मंत्री | सदस्य; |
| (छ) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्री | सदस्य; |
| (ज) वित्त मंत्री | सदस्य; |
| (झ) वन मंत्री | सदस्य; |
| (ञ) महसूल मंत्री | सदस्य; |
| (ट) नगरविकास मंत्री | सदस्य; |
| (ठ) कृषी राज्यमंत्री | सदस्य; |
| (ड) सचिव, कृषी विभाग | सदस्य-सचिव. |

(३) महिला शेतकरी सक्षमीकरण परिषद, वर्षातून किमान एकदा बैठक घेईल आणि जेव्हा जेव्हा आवश्यक असेल तेव्हा देखील बैठक घेईल.

(४) महिला शेतकरी सक्षमीकरण परिषद, पुढील अधिकारांचा वापर करील आणि पुढील कार्ये पार पाडील:-

(क) या अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी संपूर्ण धोरणविषयक निदेश देणे;

(ख) महाराष्ट्रातील महिला शेतकऱ्यांच्या स्थितीचा आढावा घेणे आणि धोरणात्मक सुधारणांची शिफारस करणे;

(ग) महिला शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी विविध विभागांमध्ये समन्वय असल्याची सुनिश्चिती करणे;

(घ) महिला शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात पत कर्ज, बाजारपेठा, विमा, तंत्रज्ञान व विस्तार सेवा मिळण्याच्या धोरणांना मान्यता देणे.

राज्य संनियंत्रण समितीची स्थापना.

**१३.** (१) राज्य शासन, या अधिनियमाच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करण्यासाठी राज्य संनियंत्रण समिती घटित करील.

(२) राज्य संनियंत्रण समिती, पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल :-

| | | |
|---|---|---|
| (क) | मुख्य सचिव | अध्यक्ष; |
| (ख) | सचिव, कृषी विभाग | सदस्य; |
| (ग) | सचिव, वित्त विभाग | सदस्य; |
| (घ) | सचिव, महिला व बाल विकास विभाग | सदस्य; |
| (ङ) | सचिव, ग्राम विकास विभाग | सदस्य; |
| (च) | सचिव, वन विभाग | सदस्य; |
| (छ) | सचिव, महसूल विभाग | सदस्य; |
| (ज) | सचिव, नगर विकास विभाग | सदस्य; |
| (झ) | सचिव, सहकार विभाग | सदस्य; |
| (ञ) | सचिव, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग | सदस्य; |
| (ट) | कृषी आयुक्त | सदस्य-सचिव. |

(३) समिती, तिला सहाय्य करण्यासाठी किंवा सल्ला देण्यासाठी कृषी, पणन, बँक व्यवसाय, जल संधारण, लिंगभाव आधारित अभ्यास, कायदा, अर्थशास्त्र व संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञ यांना, तिच्या बैठकींमध्ये निमंत्रित करू शकेल.

(४) समिती, वर्षातून किमान दोन वेळा बैठक घेईल आणि सलग दोन बैठकींमध्ये, सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधी नसेल आणि समिती, तिच्या बैठकींमध्ये ती ठरवील अशा कार्यपद्धती विषयक नियमांचे पालन करील.

(५) समिती, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी पुढील कर्तव्ये पार पाडील व कार्ये करील :-

(क) या अधिनियमाच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करण्याचे निर्देशांक व मापदंड विकसित करणे;

(ख) महिला शेतकऱ्यांना मान्यता देणे, प्रमाणपत्र देणे आणि त्याचे नुतनीकरण करणे या प्रक्रियेचे संनियंत्रण करणे;

(ग) महिला शेतकऱ्यांना, राज्य शासनाच्या व केंद्र सरकारच्या विविध योजनांखाली लाभ, अर्थसहाय्य, पत कर्ज, विमा व सेवा मिळण्याचे संनियंत्रण करणे; आणि

(घ) व्यथा, अडचणी व अंमलबजावणीतील विलंब यांचे परीक्षण करणे आणि सुधारात्मक उपाययोजना सुचविणे.

महिला शेतकरी सक्षमीकरण कक्षाची स्थापना.

**१४.** (१) राज्य शासन, या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याकरिता महिला शेतकरी सक्षमीकरण कक्ष स्थापन करील.

(२) महिला शेतकरी सक्षमीकरण कक्ष, पुढील पदसिद्ध सदस्यांचा मिळून बनलेला असेल:-

| | |
|---|---|
| (क) सचिव, कृषी विभाग | अध्यक्ष; |
| (ख) आयुक्त, कृषी | सदस्य; |
| (ग) उप सचिव, कृषी विभाग | सदस्य; |
| (घ) कृषी विभागाचे सर्व संचालक | सदस्य; |
| (ङ) कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) | सदस्य- सचिव. |

(३) महिला शेतकरी सक्षमीकरण कक्ष, त्यास सहाय्य करण्यासाठी किंवा सल्ला देण्यासाठी कृषी, पणन, बँक व्यवसाय, जल संधारण, लिंगभाव आधारित अभ्यास, कायदा, अर्थशास्त्र व संबंधित क्षेत्रांतील तज्ज्ञांना त्याच्या बैठकींमध्ये निमंत्रित करू शकेल.

(४) महिला शेतकरी सक्षमीकरण कक्षाची कर्तव्ये व कार्ये पुढीलप्रमाणे असतील :-

(क) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी नोडल एजन्सी म्हणून काम करणे;

(ख) महिला शेतकऱ्यांना लाभ व सेवा प्रदान करण्यासाठी सर्व संबंधित विभागांशी समन्वय साधणे;

(ग) महिला शेतकरी सक्षमीकरण परिषदेला व राज्य संनियंत्रण समितीला तांत्रिक व सचिवालयीन सहाय्य पुरविणे;

(घ) या अधिनियमाच्या तरतुदींच्या अंमलबजावणीबाबत राज्य शासनासाठी धोरण, विश्लेषणात्मक अहवाल तयार करणे, आणि शिफारशी करणे;

(ङ) महिला शेतकऱ्यांसाठी नियतकालिक अभ्यास करणे आणि परिस्थितीजन्य-विश्लेषण करणे;

(च) लिंगभाव-प्रतिसादक्षम कृषी तंत्रज्ञान, यांत्रिकीकरण व नवशोध यांना चालना देणे;

(छ) संशोधन संस्था, विद्यापीठे, वित्तीय संस्था, शेतकरी उत्पादक संघटना, स्वयंसहाय्यता गट आणि अशासकीय संघटना यांच्याशी समन्वय साधणे; आणि

(ज) अधिनियमाच्या अंमलबजावणीबाबत वार्षिक अहवाल तयार करणे आणि तो, राज्य शासनाला सादर करणे.

महिला शेतकरी सहायक अधिकारी.

**१५.** (१) राज्य शासन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे,-

(क) गट पातळीवर, कृषी अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यास, महिला शेतकरी सहायक अधिकारी म्हणून, आणि

(ख) जिल्हा पातळीवर, कृषी उपसंचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यास, महिला शेतकरी सहायक अधिकारी म्हणून,

पदनिर्देशित करील.

(२) महिला शेतकरी सहायक अधिकारी, पुढील कर्तव्ये पार पाडतील व कार्ये करीलः-

(क) महिला शेतकरी प्रमाणपत्र मिळविण्यामध्ये महिला शेतकऱ्यांना सहाय्य करणे;

(ख) महिला शेतकऱ्यांना मान्यता देण्यामध्ये आणि महिला शेतकरी प्रमाणपत्रे देण्यामध्ये ग्रामसभांना व नगर पंचायतींना सहाय्य करणे;

(ग) महिला शेतकऱ्यांना, वैयक्तिकरीत्या किंवा त्यांच्या गटांना, या अधिनियमाखालील त्यांच्या हक्कांशी संबंधित असणारी माहिती पुरविणे; आणि

(घ) लिंगभाव-प्रतिसादक्षम विस्तार सेवा पुरविण्यासाठी राज्य शासनाला सहाय्य करणे.

सद्भावनापूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण.

**१६.** या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींनुसार, सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल, राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध किंवा कर्मचाऱ्याविरुद्ध अथवा महिला शेतकरी सक्षमीकरण कक्षाच्या कोणत्याही सदस्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.

हा अधिनियम अन्य कोणत्याही कायद्यांचे न्यूनीकरण करणार नाही.

**१७.** या अधिनियमामध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्याखेरीज, या अधिनियमाच्या तरतुदी, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यांच्या तरतुदींशिवाय असतील व त्यांचे न्यूनीकरण करणाऱ्या नसतील.

नियम करण्याचा अधिकार.

**१८.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाची सर्व किंवा त्यापैकी कोणतीही प्रयोजने पार पाडण्यासाठी, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) विशेषतः, आणि पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाधा न येता, अशा नियमांमध्ये, पुढीलपैकी सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद करण्यात येईलः-

(क) महिला शेतकरी, कलम ५ च्या पोट-कलम (१) अन्वये पदनिर्देशित अधिकाऱ्यास ज्या नमुन्यात व ज्या रीतीने अर्ज सादर करील तो नमुना व ती रीत;

(ख) पदनिर्देशित अधिकारी, कलम ५ च्या पोट-कलम (४) अन्वये ज्या नमुन्यात व रीतीने महिला शेतकरी प्रमाणपत्र देण्यात येईल तो नमुना व ती रीत;

(ग) कलम ५ च्या पोट-कलम (६) अन्वये अपील अधिकाऱ्याकडे अपिल करण्याचा नमुना व रीती ;

(घ) महिला शेतकरी, कलम ६ च्या पोट-कलम (१) अन्वये पदनिर्देशित अधिकाऱ्यास ज्या नमुन्यात व ज्या रीतीने अर्ज सादर करील तो नमुना व ती रीत ;

(ङ) पदनिर्देशित अधिकारी, कलम ६ च्या पोट-कलम (४) अन्वये ज्या नमुन्यात व ज्या रीतीने महिला शेतकरी प्रमाणपत्र देईल तो नमुना व ती रीत ;

(च) कलम ६ च्या पोट-कलम (६) अन्वये अपील अधिकाऱ्याकडे अपील करण्याचा नमुना व रीत ;

(छ) कलम १० च्या पोट-कलम (१) अन्वये ज्या रीतीने महिला शेतकरी आधारसामग्री (डेटाबेस) गोळा करण्यात येईल आणि ठेवण्यात येईल ती रीत;

(ज) कलम ११ च्या पोट-कलम (२) च्या खंड (घ) अन्वये ज्या बाबींसाठी राज्य निधीचा वापर करण्यात येईल अशा इतर बाबी;

(झ) या अधिनियमाअन्वये ज्या बाबींसाठी नियम करणे आवश्यक असेल, अशा अन्य कोणत्याही बाबी.

(३) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनात मिळून, एकूण तीस दिवसांच्या होईल इतक्या कालावधीकरिता, सत्रासीन असताना, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने मांडण्यात आला असेल, ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, जर कोणत्याही नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल, आणि तशा अर्थाचा त्यांचा निर्णय, **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करतील तर, तो नियम, अशा निर्णयाची अधिसूचना, प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये यापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**१९.** (१) जर या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, ती अडचण दूर करण्यासाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, या पोट-कलमान्वये असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३९ व ४३ मध्ये अंतर्भूत असलेल्या राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, राज्याने, सर्व नागरिकांसाठी उपजीविकेच्या पुरेशा साधनांची सुनिश्चित करण्याची, सामाजिक व आर्थिक न्यायाला चालना देण्याची आणि संसाधने व संधी यांचे समन्याय व लिंगभाव-प्रतिसादक्षम वाटप करण्यासाठी आपली धोरणे निर्देशित करण्याची आवश्यकता आहे.

**२.** कृषी धोरणे, योजना व विस्तार प्रणाली, मोठ्या प्रमाणात लिंगभाव-निरपेक्ष आहेत. परंतु, बहुतेक कृषी योजना व त्या खालील हक्क, यांचा लाभ मिळण्यासाठी शेत जमिनीची मालकी असणे ही पूर्वअट असून, महिलांपैकी काही टक्के महिलांकडेच केवळ शेत जमीन असल्याने, अनेक महिला शेतकऱ्यांना अशा योजनांचा लाभ मिळणे दुर्लभ झालेले आहे. अशा प्रकारे, जमिनीचे औपचारिक मालकीहक्क धारण करीत नसल्याने, कौटुंबिक किंवा सामुदायिक जमिनीवर शेती करणाऱ्या महिलांची गणना, शेतकरी म्हणून न करता, अनेकदा शेतमजूर म्हणून केली जाते. त्याचप्रमाणे, मासेमारी, गौण वन उत्पादने गोळा करणे, कुक्कुटपालन, पशुसंवर्धन, इत्यादींसारख्या बिगर लागवड आधारित संलग्न कार्यांमध्ये सहभागी असलेल्या महिलांना देखील शेतकरी म्हणून मान्यता दिली जात नाही. महिला शेतकऱ्यांना व त्यांच्या कृषी श्रमास पद्धतशीरपणे न देण्याचे प्रमाण लक्षणीय आहे आणि त्यामुळे, त्यांना योजना, पतकर्ज व बाजारपेठ मिळण्यातील भेदभावासह, परंतु तेवढ्यापुरतेच मर्यादित नसलेल्या, इतर प्रकारच्या उपेक्षेला देखील तोंड द्यावे लागते.

**३.** म्हणून, शेती व संलग्न कार्यांमध्ये सहभागी असलेल्या महिलांना महिला शेतकरी म्हणून मान्यता देण्यासाठी आणि त्यांना हक्क, लाभ, अर्थसहाय्य, सेवा व पतकर्ज मिळणे शक्य व्हावे यासाठी त्यांना महिला शेतकरी प्रमाणपत्र देण्यासाठी नवीन कायदा करणे इष्ट आहे असे शासनास वाटते. प्रस्तावित कायद्यामध्ये, महिला शेतकरी सक्षमीकरण परिषद व कक्ष राज्य संनियंत्रण समिती तसेच महिला शेतकरी निधी स्थापन करण्यासाठी व त्यांची आधारसामग्री (डेटाबेस) संकलित करण्यासाठी व ती ठेवण्यासाठी देखील तरतूद केलेली आहे.

**४.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई, **दत्तात्रय भरणे,**

दिनांक ३० जून २०२६. कृषी मंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :-

**खंड ४. –** या खंडान्वये, राज्य शासनाकडे पुढील अधिकार घेण्यात आलेले आहेतः-

(क) उप-खंड (१) अन्वये,-

(एक) ग्रामपंचायत क्षेत्राकरिता, सहायक कृषी अधिकारी; आणि

(दोन) नगर पंचायत क्षेत्राकरिता, कृषी अधिकारी,

याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसेल असा अधिकारी, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, पदनिर्देशित अधिकारी म्हणून पदनिर्देशित करण्याचा;

(ख) उप-खंड (२) अन्वये, त्यास योग्य वाटेल अशा क्षेत्रांसाठी तालुका कृषी अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसेल इतक्या संख्येतील अधिकाऱ्यांना, अपील अधिकारी म्हणून **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियुक्ती करण्याचा.

**खंड ५.–** या खंडान्वये, राज्य शासनाकडे पुढील अधिकार घेण्यात आलेले आहेतः-

(क) उप-खंड (१) अन्वये, ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये, महिला शेतकरी, प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज करण्याची रीत व नमुना, नियमांद्वारे विहित करण्याचा;

(ख) उप-खंड (४) अन्वये, महिला शेतकरी प्रमाणपत्र देण्याचा नमुना व रीत, नियमांद्वारे विहित करण्याचा;

(ग) उप-खंड (६) अन्वये, अपील अधिकाऱ्याकडे अपील करण्याचा नमुना व रीत, नियमांद्वारे विहित करण्याचा.

**खंड ६.–** या खंडान्वये, राज्य शासनाकडे पुढील अधिकार घेण्यात आलेले आहेतः-

(क) उप-खंड (१) अन्वये, नगर पंचायत क्षेत्रामध्ये, महिला शेतकरी प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज करण्याची रीत व नमुना, नियमांद्वारे विहित करण्याचा;

(ख) उप-खंड (४) अन्वये, महिला शेतकरी प्रमाणपत्र देण्याचा नमुना व रीत, नियमांद्वारे विहित करण्याचा;

(ग) उप-खंड (६) अन्वये, अपील अधिकाऱ्याकडे अपील करण्याचा नमुना व रीत, नियमांद्वारे विहित करण्याचा.

**खंड ८ (२).–** या खंडान्वये, महिला शेतकरी प्रमाणपत्र धारक ज्यासाठी हक्कदार आहेत अशी धोरणे, कार्यक्रम व योजना अधिसूचित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १०(१).–** या खंडान्वये, महिला शेतकरी आधारसामग्री (डेटाबेस) संकलित करण्याची व ती ठेवण्याची रीत, नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ११. –** या खंडान्वये,-

(क) उपखंड (१) (ग) अन्वये, महाराष्ट्र राज्य महिला शेतकरी निधीत जमा करण्यात येईल अशी अन्य कोणतीही रक्कम अधिसूचित करण्याचा;

(शा.म.मु.) एचबी-६९६–४ (१,०४५—६-२०२६)

(ख) उपखंड (२) (घ) अन्वये, महाराष्ट्र राज्य महिला शेतकरी निधीचा वापर करण्याच्या संबंधातील अन्य कोणत्याही बाबी, नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार,

राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १२(१).-** या खंडान्वये, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे,महिला शेतकरी सक्षमीकरण परिषद स्थापन करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १८(१).-** या खंडान्वये, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **शासकीय राजपत्रात** अधिसूचना काढून, त्याद्वारे नियम करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १९(१).-** या खंडान्वये, या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना, ज्या उद्‌भवतील अशा कोणत्याही अडचणी दूर करण्यासाठी, **शासकीय राजपत्रात** आदेश काढण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे वर नमूद केलेले प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचे आहेत.

## वित्तीय ज्ञापन

या विधेयकाच्या खंड ११ मध्ये, महाराष्ट्र राज्य महिला शेतकरी निधी घटित करण्यासाठी तरतूद केलेली आहे. या उक्त निधीचा, महिला शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी व विकासासाठी सहाय्य करणे, महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी वित्त पुरवठा उपाययोजना करणे, महिला शेतकऱ्यांच्या कल्याणास सहाय्य करण्यासाठी व विकास करण्यासाठी सुविधा पुरविणे, आणि विहित करण्यात येतील अशा इतर बाबींसाठी वापर करण्यात येईल. याशिवाय, केंद्र सरकारकडून किंवा राज्य शासनाकडून मिळालेली अनुदाने, तसेच देणग्या व इतर स्त्रोताद्वारे मिळणारा निधी, उक्त निधीमध्ये जमा करण्यात येतील.

हे विधेयक, राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून अधिनियमित झाल्यावर, महाराष्ट्र राज्य महिला शेतकरी निधीमध्ये राज्य शासनाने दिलेल्या अनुदानापोटी राज्याच्या एकत्रित निधीतून करावयाच्या आवर्ती खर्चाचा अंतर्भाव असेल. तथापि, या बाबतीत करावयाच्या प्रत्यक्ष आवर्ती खर्चाचा अंदाज देणे या टप्प्यावर शक्य नाही.

## भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ अन्वये राज्यपालांची शिफारस

(महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, आदेशाची प्रत)

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ याच्या खंड (३) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन, ते महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक, २०२६ विचारात घेण्याबाबत राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांना शिफारस करीत आहेत.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४८.]**

**[महिला शेतकऱ्यांना विविध कल्याणकारी धोरणे,
कार्यक्रम, योजना व पतकर्ज यांचा लाभ मिळणे
शक्य व्हावे या दृष्टीने, महिला शेतकऱ्यांना
मान्यता देण्यासाठी व महिला शेतकरी
प्रमाणपत्रे देण्यासाठी, महिला शेतकऱ्यांची
आधारसामग्री (डेटाबेस) तयार करण्यासाठी,
महाराष्ट्र राज्य महिला शेतकरी निधी,
महिला शेतकरी सक्षमीकरण कक्ष,
महिला शेतकरी सक्षमीकरण परिषद व
राज्य संनियंत्रण समिती स्थापन करण्यासाठी
आणि तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी
तरतूद करण्याकरिता विधेयक.]**

**[श्री. दत्तात्रय भरणे,**
कृषी मंत्री.**]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई